# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०५/०१/२०२६ (सोमवार )**

## नागपूर ग्रामीण पोलिसांनी वर्चस्व निर्माण करून दहशत पसरविणाऱ्या ६ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कारवाई केली.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :— मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांचे मार्गदर्शनात कळमेश्वर पोलीसांनी **वर्चस्व निर्माण करून दहशत पसरविणाऱ्या आरोपीतांचा** टोळी प्रमुख तसेच सदस्य अशा एकुण ६ आरोपीतांविरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम अन्वये कारवाई केली आहे. सदर टोळीचा प्रमुख आरोपी नामे १) हरीश मोहन ग्वालवंशी, वय ५० वर्षे, रा. मकरधोकळा ता.जि. नागपुर हा असुन टोळी सदस्य आरोपी २) रोशन बबन यादव, वय ३२ वर्षे, रा. मकरधोकळा ता. जि.नागपुर ३) आशुतोष शैलेश ग्वालवंशी, वय २६ वर्षे, रा.मकरधोकळा ता.जि.नागपुर ४) अनिकेत अनिल उईके, वय २८ वर्षे, रा.मकरधोकळा ता.जि. नागपुर ५) आशिष विष्णु गिरी, वय ३४ वर्षे, रा.गंगा नगर,काटोल रोड, नागपुर ६) राजेश्वर उर्फ काल्या किसनजी सोनारे, वय ४५ वर्षे रा. मकरधोकडा ता. जि.नागपुर हे आहेत.

दिनांक २३/११/२०२५ रोजी रात्री ११.०० वा सुमारास विसावा बार ॲड रेस्टॉरेन्ट समोरील रोडवर फिर्यादी जखमी नामे आरिफ लतीफ शेख रा. मातापुरा कळमेश्वर याला आरोपी १) हरिष ग्वालबंसी २) राजू सोनारे ३) आशिष गिरी (४) रोशन बबन यादव ५) आशुतोष शैलेश ग्वालबंसी ६) अनिकेत अनिल उईके सर्व रा. नागपूर यांनी जुन्या वादाचे कारणावरून गैरकायद्याची मंडळी जमवून जखमी आरिफला जिवे मारण्याचे उददेशाने लाठी, दगड व हातबुककीने गारहाण करून जखमी केले व कारमध्ये अपहरण करून मारहाण करत

फ्रेन्डस् कॉलनी येथे घेवून गेले. सदर प्रकरणी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १०९, १४०(१). १८९(२), १९०,१९१ (३) भान्यासं प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सर्व आरोपीतांना अटक करण्यात आली .

पोलीसांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास केला असता असे निदर्शनास आले की, सदर गुन्हा हा संघटीतरित्या केलेला असुन नमुद संघटित गुन्हेगारी टोळीचा प्रमुख हरीश मोहन ग्वालवंशी हा नेहमी एकटयाने किंवा साथीदारांसह गुन्हे करीत आलेला आहे. नमुद टोळी प्रमुख व टोळीतील सदस्य हे आर्थिक फायदयासाठी तसेच परिसरात त्यांचे टोळीची दहशत व वर्चस्व पसरविण्यासाठी खुन, खुनाचा प्रयत्न करने, खंडणी, अपहरण, प्राणघातक शस्त्र बाळगणे, गैरकायदयाची मंडळी जमविणे तसेच गंभीर दुखापत पोहचवून शिवीगाळ करणे, जिवे मारण्याची धमकी देणे, अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे करीत असतात. सदर टोळी प्रमुख आाणि सदस्यांवर नागपूर ग्रामीण, नागपूर शहर या जिल्हयामध्ये सन २०१७ चे पुर्वी पासुन अनेक गुन्हे नोंद आहेत. आरोपीतांचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचेवर गुन्हे नोंद करून प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपीतांनी त्यांची गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. टोळी प्रमुख आरोपी याचेवर पोलीस स्टेशन गिट्टीखदान, पोलीस स्टेशन सदर, पोलीस स्टेशन सिताबर्डी ,नागपुर शहर येथे आणि पोलीस स्टेशन कळमेश्वर नागपुर ग्रामीण येथे ११ गुन्हयांची नोंद आहे. तसेच टोळीचे इतर सदस्यांवर सुध्दा नागपुर शहर आणि ग्रामीण येथे अनेक गुन्हे नोंद आहे.

**कळमेश्वर पोलीसांनी नमुद ६ आरोपीतांच्या टोळी विरुद्ध महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये प्रस्ताव तयार करून मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्फतीने मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे सादर केला असता मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांच्या कार्यालयाकडुन सदर प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने सदर गुन्हयात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ (MCOCA) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे.**




हरीश मोहन ग्वालवंशी



रोशन बबन यादव



आशुतोष शैलेश ग्वालवंशी



अनिकेत अनिल उईके




आशिष विष्णु गिरी



राजेश्वर उर्फ काल्या किसनजी सोनारे

# ५२.३० ग्रॅम वजनाचा २ लाख ६१ हजार रूपयांचा अंमली पदार्थ (मेफेड्रोन पावडर) जप्त, आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, आरोपी अटक
# नागपूर ग्रामीण पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन बोरी** :– दिनांक ०४/०१/२०२६ रोजी अंमली पदार्थ विरोधी कारवाई पथक हे नागपुर उपविभागात पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदाराने खात्रीशीर माहीती दिली की, अंमली पदार्थ ( मेफेड्रोन पावडर) ची देवाण घेवाण होणार आहे. नमुद पथकाने सदर माहीती बोरी पोलीसांना देत बोरी पोलीसांसह सयुंक्तीक कारवाई करत मिळालेल्या माहीतीच्या आधारे नमुद आरोपी शोध कामी सतर्क पेट्रोलींग केली. सदर पथकाला बोरी पोलीस स्टेशन हद्दीत बोरखेडी फाटक कडे जाणाऱ्या रोडवर रेल्वे पुलीया च्या बाजुला साई ले आउटच्या मोकळ्या जागेत एक संशयास्पद कार दिसली. नमुद कार चालक पोलीस वाहनाला पाहुन कारसह पळुन गेला मात्र कारच्या बाजुला उभा असलेल्या आरोपीस पळुन जातांना पोलीसांनी शिताफिने पकडुन त्याचे नाव पत्ता विचारले असता **मंगेश गोपाल भोंडगे, वय. ३४ वर्षे धंदा मजुरी, रा. मेटा उमरी पोस्ट, मोहगाव ता. हिंगणा जि.नागपुर** अशी माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली त्याचेकडे अंमली पदार्थ मेफेड्रोन पावडर मिळुन आला.

नमुद आरोपीच्या ताब्यातुन १) अंमली पदार्थ मेफेड्रोन पावडर वजन ५२.३० ग्रॅम किंमती २,६१,५००/—रूपयांचा मुद्देमाल आरोपीकडुन जप्त करण्यात आला आहे. अंमली पदार्थ मेफेड्रोन पावडर पुरवाठा करणारा आरोपीबाबत माहीती पोलीसांना प्राप्त झाली असुन पोलीस त्याचा शोध घेत आहे.

नमुद प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन बोरी येथे एन. डी. पी. एस. कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**




## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद आरोली पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन आरोली** :— दिनांक ०४/०१/२०२६ रोजी आरोली पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी मौजा घोटमुंढरी येथे नाकाबंदी केली असता ट्रक क्र. एम.एच. ४० बि.एल. १०१० हा मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असतात्यामध्ये रेती आढळुन आली. **आरोपी क्रं १) वाहन चालक नामे कार्तीकस्वामी योगीराज वंजारी, वय २८ वर्षे, रा. खरबी, ता. तुमसर, जि. भंडारा** हा मिळुन आला. त्याला रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही

परवाना नसल्याबाबत माहीती प्राप्त झाली. **आरोपी क्रं २) वाहन मालक नामे प्रशांत देवचंद आगासे, रा. इंदीरा वार्ड, भंडारा, जि. भंडारा** याच्या सांगणेवरून अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करीत असल्याबाबत माहीती त्याने दिली.

**पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक क्र. एम. एच. ४० बि. एल. १०१० किमती ३०,००,०००/— रूपये आणि ६ ब्रास रेती असा एकुण ३०,३०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

नमुद आरोपीतांच्या विरूध्द पोस्टे अरोली येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. **आरोपी क्रं १ याला अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद बेला पोलीस आणि महसुल विभाग यांची संयुक्त कामगिरी

**पोलीस स्टेशन बेला** — दिनांक ०५/०१/२०२६ रोजी पिपरा येथील कोतवाल यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पिपरा शिवारातील नांद नदीतील पात्रातून रेतीची अवैधरित्या चोरी होत आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे बेला पोलीसांनी कोतवाल, पिपरा यांचे सोबत संयुक्त रित्या कारवाई केली असता मौजा पिपरा शिवार येथे ट्रॅक्टर मुंडा क्रमांक एम एच ४० ए एम १८९४ आणि विना क्रमांकाची ट्रॉली रेती सह मिळून आले. पोलीस पथकाला पाहुन आरोपी पळुन गेले. **पोलीसांनी पंचासमक्ष ट्रॅक्टर मुंडा क्रमांक एम एच ४० एएम १८९४ आणि विना क्रमांकाची ट्रॉली आणि १ ब्रास रेती असा एकुण ६,५५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

**नमुद प्रकरणी आरोपी क्रं १) राजकुमार कामडी, २) सुधाकर खडगी, ३) नरेश सोरते आणि ४) मोहन मांडसकर सर्व रा. पिपरी यांच्या विरूध्द पोस्टे बेला येथे कलम ३०३(२), ३(५) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

# नागपूर ग्रामीण जिल्हयात साजरा करण्यात येत आहे 'रेझिंग डे' सप्ताह

**२ जानेवारी हा दिवस महाराष्ट्र राज्य पोलिस दलाच्या स्थापनेचा वर्धापन दिन म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र सरकारने हा दिवस अधिकृतरित्या पोलिस रेझिंग डे म्हणून घोषित केला असून, दिनांक ०२ ते ०८ जानेवारी पर्यंत रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. आज दिनांक ०५/०१/२०२६ रोजी रेझिंग डे' सप्तहा अंतर्गत नागपूर ग्रामिण पोलीस दलातर्फे विविध उपक्रम घेण्यात आले आहे.**

## पोलीस बँड पथकाचे विशेष प्रदर्शन

पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत नगरपरिषद कनिष्ठ महाविदयालय येथे तसेच पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत भालेराव हायस्कूल, सावनेर येथे महाराष्ट्र पोलीस दलाच्या स्थापना दिनानिमित्त (रेझिंग डे) नागपूर ग्रामीण पोलीस दलातर्फे पोलीस बँड पथकाचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. हे प्रदर्शन विदयार्थ्यांना आणि नागरिकांना पोलीस दलाच्या विविध विभागांची ओळख करून देण्याच्या उद्देशाने साजरे होत आहे. या प्रदर्शनात पोलीस बँड पथकाने आकर्षक वादन सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

## विदयार्थ्यांची पोलीस स्टेशनला भेट

पोलीस स्टेशन कन्हान येथे वत्सला गोपी शाळेच्या विदयार्थ्यांना, पोलीस स्टेशन काटोल येथे नगरपरिषद कनिष्ठ महाविदयालयाचे विदयार्थ्यांना, पोलीस स्टेशन रामटेक येथे समर्थ विदयालयाचे विदयार्थ्यांना, पोलीस स्टेशन पारशिवणी येथे हरीहर महाविदयालयाचे विदयार्थ्यांना, पोलीस स्टेशनला आंमत्रित करून शाळेतील विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनची रचना आणि कामकाजा विषयी माहीती दिली. पोलीस स्टेशन मधील विविध शाखा दाखविण्यात आल्या तसेच पोलीस स्टेशन मधील शस्त्रे दाखवुन त्या विषयी माहिती देण्यात आली. कार्यक्रमास विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले होते. तसेच पोलीस स्टेशन वेलतुर अंतर्गत मुकुंदराज स्वामी येथे, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी अंतर्गत सरस्वतीबाई निस्ताने विदयालय येथे, पोलीस स्टेशन काटोल अंतर्गत नगर परिषद कनिष्ठ महाविदयालय येथे, पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत जूनियर कॉलेज ऑफ कॉमर्स अँड आर्ट मॉर्निंग स्टार कॉन्वहेंट या शाळांना भेट देवुन शालेय विदयार्थ्यांना पोलीस स्टेशनचे दैंनदिन कामकाजाबाबत माहीती देण्यात आली. तसेच वाहतुक नियम, सोशल मिडीया चा वापर

तसेच सायबर गुन्हयांबाबत माहीती, डायल ११२ माहीती देवुन जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

**विदयार्थ्यांसह प्रभातफेऱ्या** :— पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत भारसिंगी येथे शालेय विद्यार्थ्या आणि पोलीस यांनी भारसिंगी गावातून प्रभात काढली. तसेच पोलीस स्टेशन सावनेर अंतर्गत भालेराव विद्यालय सावनेर ते पोलीस स्टेशन सावनेर पर्यंत पोलीस व विद्यार्थी प्रभात फेरी काढण्यात आली.प्रभातफेरी दरम्यान सुध्दा नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.




PM SHRI
नगर परिषद हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय काटोल
ता. काटोल . जि. नागपूर
या वे ज्ञा ना सा ठी
जा वे से वे सा ठी
सु स्वा ग त म


नागपुर ग्रामीण
पोलीस ठाणे कन्हान
महाराष्ट्र पोलीस दल स्थापना दिवस
(Raising Day)


पोलीस स्टेशन, सावनेर
जि.नागपूर, (ग्रामिण)
पोलीस स्टेशन, सावनेर
जि.नागपूर, (ग्रामिण)
महाराष्ट्र पोलीस
RAISING DAY
पोलीस स्टेशन, सावनेर
हार्दिक शुभेच्छा..!


पोलीस स्टेशन
पारशिवनी
फोन नं. : ०७१०२-२२५१२३


पोलीस स्टेशन,रामटेक.
महाराष्ट्र पोलीस
स्थापना दिवस
सप्ताह सोहळा व जनजागृती कार्यक्रम
पोलीस स्टेशन, रामटेक
MAHARASHTRA POLICE
RAISING DAY









मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने